# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 20/12/2023 (बुधवार) दुपार

---

### लोखंडी पाटया चोरी

पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत १४ कि.मी. अंतरावरील मौजा पाटणसावंगी येथे दिनांक १६/१०/२०२३ चे १२.०० वा. ते दिनांक २६/११/२०२३ चे ०९.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— सौ. रोशनी सुधीर ठाकरे ही ग्रामपंचायत पाटणसावंगी येथे सरपंच या पदावर असुन सदर ग्रामपंचायतला उपविभाग मृदा व जलसंधारण विभाग कळमेश्वर यांचे मार्फत एकुण ८५ लोखंडी पाटबंधारेला लावण्या करीता मिळाल्या होत्या त्या सर्व लोखंडी पाटया पावसाळा सुरू होण्यापुर्वी काढुन ठेवल्या होत्या त्यापैकी ७९ लोखंडी पाटया प्रत्येकी ५००/— रू प्रमाणे एकुण किंमती ३१,५००/—रूपयाचा मुद्देमाल यातील अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन सावनेर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार चटप मो. नं. ९९७०८४६७६५ हे करीत आहे.

### विनयभंग

पो.स्टे. बुट्टीबोरी :— दिनांक १८/१२/२०२३ चे २०.०० वा. ते २०.३० वा. दरम्यान फिर्यादी ही क्लासेस वरून घरी जात असताना यांतील **आरोपी नामे— गुरूदेव कैकाडी वय ४० वर्ष रा. दुर्गामाता मंदीर वार्ड नं. ०४ नविन वस्ती बुटीबोरी ता. जि. नागपुर** याने फिर्यादीला घरी सोडुन देतो असे म्हणुन आपले मोटर सायकलवर बसवुन घरी न नेता वर्धा रोडनी मोटारसायकल नेत असताना तिचा हात पकडण्याचा प्रयत्न केला सदर घटनेबाबत आई वडीलांना सांगितले असता आरोपीने फिर्यादीची माफी मागीतली व दिनांक १८/१२/२०२३ रोजी फिर्यादीचा तिचे कोचींग क्लासेसकडे जात येत असताना वारंवार पाठलाग केला त्यावेळी फिर्यादीचे आईने त्याला पाठलाग का करते म्हणुन जाब विचारले असता भांडण करून शिवीगाळ केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बुट्टीबोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३५४अ, ३५४(ड), भादवी सहकलम ८, १२ बालकांचे लैंगीक अपराध संरक्षण अधिनियम कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सपोनि भोयर मो. नं. ९८३४८२५७९३ या करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर